# लोककथा लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

डॉ. संगीता विठ्ठल साळवे,

मराठी विभाग,

पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

प्रवरानगर ता. राहाता जि. अहिल्यानगर. महाराष्ट्र ( भारत )

( सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत )

Email. wakolesangita@gmail.com

प्रस्तावना :- आजचे युग टीव्ही संगणक व इंटरनेटचे असले तरी लोककथेची गोडी कमी झालेली नाही. प्राचीन काळी ही साधने उपलब्ध नव्हती, तेव्हा कथाकथन हा लोककथेचा प्रकार लोकरंजनाचे कार्य करत होता. एखाद्या जादूगाराप्रमाणे पशुपक्षी,प्राणीमात्र, देवदिकांच्या, परींच्या कथा ह्या लोकसाहित्यातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे किंवा पुढच्या पिढीकडे संक्रमित होत होत्या. म्हणूनच अतिसामान्यापासून असामान्यापर्यंत, लहानांपासून थोरापर्यंत, सुशिक्षितांपासून अशिक्षितांपासून राजापासून रंकापर्यंत, समाजातील सर्व स्तरातील लोकघटकांना कथेने भुरळ घातलेली होती.त्याचप्रमाणे लोककला सुद्धा मानवीसमूहाचे प्रतिनिधित्व करतात. मानवी लोकसमूहाचे ग्रामीण आणि नागर असे साधारणपणे दोन भाग पडतात.नागरीकरणाचा त्यातून उद्भवणाऱ्या दिखाऊ कृत्रिमपणाचा प्रभाव ग्रामीण व नागर जीवन पद्धतीत कार्यरत असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांची जीवनशैली ही निसर्गाशी इमान राखणारी असते. हे आदिम ग्रामीण लोकसमूह आपले जीवन जगत असताना जगण्याचा अंगभूत भाग म्हणून आपल्या जीवनशैलीचा जो कलात्मक अविष्कार करतात. त्याला लोककला असे म्हणतात. लोककला ही संज्ञा व्यापक आहे. जुन्या कपड्यांची गोधडी शिवण्यापासून ते हातावर मेहंदी काढण्यापर्यंत हजारो प्रकारांनी लोक जीवनाच्या कलाविष्काराची यादी करता येते. जीवनाशी संबंध असणाऱ्या कोणत्या ना कोणत्या कामाशी त्यांचा संबंध असतो. लोककथा व लोककला केवळ सांस्कृतिक वारसा नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा काना आहेत सण-उत्सव ,यात्रा-जत्र व सांस्कृतिक व पर्यटन क्षेत्रामध्ये लोककला लोककलेला वाढती मागणी आहे.लोककला लोककथा जतन केल्या तर ग्रामीण भागात रोजगार निर्मितीहोऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**गृहितके-**

१.लोककथा आणि लोककला या ग्रामीण संस्कृतीचा वारसा आहेत.

२.लोककथा व लोककला या ग्रामीण संस्कृतीचे जतन व संवर्धन करतात.

३.लोककथा व लोककलामुळे ग्रामीण भागात हस्तकला विक्री होऊन स्थानिक बाजारपेठा निर्माण होतात.

४.लोककला व लोककथांना प्रशिक्षण व शासन प्रोत्साहन मिळाले तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होईल.

**लोककथा व लोककला यांचे स्वरूप:-**

अमर या भारतीय साहित्य शास्त्रज्ञाने आपल्या 'सारसुंदरी' या ग्रंथात म्हटले आहे की, 'सांगण्यासारखे असेल त्याची रचना कल्पनेने स्वतः करणे म्हणजेच लोककथा होय.' लोककथा ह्या निर्माण होताना विविध अवस्था सांगितलेल्या आहेत. पहिल्या अवस्थेत आदिमानवाने सृष्टीमधील घडामोडींचे ज्ञान होते. पहिल्या स्वरूपात देवत्व किंवा अलौकिकत्व असते. दुसऱ्या अवस्थेत ज्ञान व्यापारात धर्म भावना किंवा श्रद्धा निर्माण झाली. पुढे तिसऱ्या अवस्थेत नीतीकथा, मनोरंजनात्मक लोककथा व चौथ्या अवस्थेत निरनिराळया प्रादेशिक विभागात कथेमध्ये बदल झाला. व त्यात वाढ झाली.नवीन शाखा फुटल्या. लोकांमध्ये रूढ झालेल्या या लोककथा परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत राहिल्याने समाजमनाशी त्या एकरूप झाल्या. व त्यातून समाजमानसाची अभिव्यक्ती होऊ लागली. जगभरातल्या सर्व भाषांमध्ये फार प्राचीन काळापासून गोष्टी सांगण्याची परंपरा आहे. रात्री शेकोटी भोवती बसून लोक एकमेकांना पशुपक्ष्यांच्या,चंद्रताऱ्यांच्या,गुराखी,शिकारी यांच्या गोष्टी सांगत असत. या कथनपरंपरेतूनच लोकसंस्कृतीचा पाया रचला जात असे. मराठी समाजजीवनात कथाकीर्तनांना महत्त्वाचे स्थान होते. रामायण-महाभारतातील काव्य ,हरिविजय,पांडव प्रताप यासारखे पौराणिक वाड्मय, बौद्धांच्या जातक कथा इत्यादी धार्मिक वाङ्मयाचे नित्यनेमाने पठण, चिंतन होत असे. पूर्वीच्या ग्रामरचनेतील गावाभोवती बांधलेले कोट, देवळे, नद्या, पाणवठे, आखर-अंगणे, घरे, हवेल्या,वाडे,गोठे, परसदार अशा परिसरातील भौतिक वस्तूमात्राशी व पर्यावरणीय घटितांशी नाते जोडीत स्त्रिया आणि घरातील जेष्ठ माणसे गोष्टी सांगत असत लोकमानसातील सुखदुःखांचे प्रेम वासल्याचे अनुभव लोककथांच्या माध्यमातून समजावून घेत.मानसिक भरणपोषण आणि सांस्कृतिक मूल्य धरणांचा वारसा पुढे नेण्याच्या दृष्टीने भारतीय लोककथांचा मौलिक ठेवा आपल्याला लाभलेला आहे. जगभरातील लोककथांची आशयसूत्रे आणि मूल्यभावांची साम्यस्थळे लोककथामध्ये आढळतात.त्यामुळे वैश्विक सांस्कृतिक ऐक्यभाव वाढीला लागण्याची क्षमता लोककलामध्ये लोककथामध्ये ठासून भरलेली आहे. लोककला हा लोकांच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग असतो. लोकजीवनात गीत, नृत्य,नाट्य, हस्तकला इत्यादी सर्वच अविष्कार दैनंदिन गरजेचा भाग म्हणून अविष्कृत होतात.कोणत्या ना कोणत्या कृतीशी त्यांचा संबंध असतो.प्रख्यात स्विस मानसशास्त्रज्ञ कार्लयुंग यांनी अबोध समूह मनाचा सिद्धांत सांगितलेला आहे ते अबोध समूह मन व्यक्ती मनातही कार्यरत असते त्यांच्या प्रेरणेने होणारे अविष्कार हे व्यक्तीनिर्मित असले तरी समूहमनाला आवाहन करणारे असतात ते समूहाला आपलेसे वाटतात त्यामुळे सर्व लोककलांमध्ये सहजपणे आलेल्या परंपरेचा भाग दर पिढीत प्रवाहित होत असतो. लोककला ह्या जुन्या असूनही नित्यनवीनच असतात.

प्राकृतिक मुक्तता, उत्स्फूर्तता व लवचिकता हे लोककलेचे अंगभूत वैशिष्ट्य असते. त्यामुळे लोककलांचा अविष्कार सदैव ताजा व जिवंत असतो. लोककलांना कृत्रिम बांधिलकी वर्ज्य असते. नेहमीतून उत्स्फूर्तपणे उसळून आलेला अविष्कार हा लोककलांचा प्राण असतो. लोककथा व लोककला प्रकार व ग्रामीण भागातील महत्व साधारणतः लोककथेचे वर्गीकरण दोन अंगाने केले जाते

१ रचनेच्या दृष्टीने

२ आशयानुसार

रचनेच्या दृष्टीने साधारणपणे लोककथेचे भाषा व रचनाच्या दृष्टीने वर्गीकरण केले जाते. अ- कथनासाठी गद्य व पद्य माध्यमांचा वापर होतो त्यामध्ये गद्यकथा गीतकथा पद्य गद्य सीमेवरील कथा एकापेक्षा जास्त कथा

जेव्हा एकत्रितपणे गुंफलेल्या आढळतात तेव्हा त्या कथांच्या विशिष्ट गुंफणीतून व रचनेतून खालील रचना प्रकार पडतात

क)स्तबक कहाणी

ख)साखळी कहाणी

ग)बुमरंग कहाणी

घ)यात्रा कहाणी

च)चौकट कथा

छ) व्रतकथा

ज)उत्पत्ती कथा

झ)दैवत कथा

ट)दंतकथा

ठ)अद्भुत कथा

ड)स्पष्टीकरण कथा

ढ)वास्तव कथा

ण) प्राणीकथा

त)हास्य कथा

थ)मालाकथा

लोककलेचे प्रकार- लोककलेचे विश्व अनेकविध स्वरूपाचे आहे कारागिरी, हस्तकला, अलंकरण मातीच्या भांड्यांची निर्मिती,दृश्य वस्तुरूप कलाप्रकार, नृत्य, नाट्य संगीतादीच्या उपयोजनातून सादर होणारे गोंधळ, दंडार, तमाशा, किर्तन, पोवाडा, यक्षगान, भारुड इत्यादी कलाप्रकारांचा समावेश लोककलांमध्ये येतो

१.गोंधळ- महाराष्ट्राच्या लोकधर्मात आणि देवकर्मात गोंधळ हा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि कुलाचाराची प्रतिष्ठा प्राप्त झालेला नाट्यरूप धार्मिक विधी आहे गोंधळी जमातीचे लोक तुळजाभवानिनी व रेणुका या आदिशक्तीच्या कुळाचार पार पाडतात त्यास गोंधळ असे म्हणतात गोंधळी या जमातीत कदमराई व रेनुराई या दोन पोटजाती आहेत. कदमराई हे तुळजापूर निवाससिनीचे भवानीचे उपासक, तर रेणुराई हे माहूरनिवासिनी रेणुकेचे भक्त असतात गोंधळ्याच्या वेशभूषेला बाणा असे म्हणतात कवड्याची माळ डोक्यावर कंगणेदार मराठी शाही पगडी असते तर कदमराई गोंधळी हे डोक्यावर कवड्याची उंच टोपी घालतात. गळ्यात चौसष्ट कवड्यांची माळ असते. व अंगात शिवणीचा पायघोळ अंगरखा घालतात. त्याला सुमारे २५ते३० मीटर कापड लागते. गोंधळाच्या गळ्यातील कवड्याच्या माळेतील कवडी हे देवीने मारलेल्या

दैत्यांच्या शिरांचे प्रतीक असते. प्राचीन मध्ययुगीन मराठी वाङ्मयामध्ये गोंधळाचे जे उल्लेख येतात त्यांचा संबंध भूतमाता या देवतेशी असावा.

उदा. " इकडे आंबेच्या दळी- आऊट कोटी भूतावळी

नव कोटीच्या मुंडा चौसष्ट कोटी योगिनी

वेताळ भैरव अपार तेहेतीस कोटी देवभार

दिवट्या घेऊन समग्र गोंधळ घालती

दैत्याचे काढुनी कोथळ तेच आंबे पुढे

चौडकी करून विशाल

रंगी नाचती वेताळ दिवट्या करी झळकती

तंत धन सुपिर चतुर्विध वाद्यांचे गजर

दुधुंभी नाचे प्रदूर नादे घट्ट भरकट असे'.

**२)जागरण**-जेजुरीचा खंडोबा हे ज्यांचे कुलदैवत आहे, अशा ब्राह्मणापासून ते मराठ्यापर्यंत अठरापगड जातीत खंडोबाच्या उपासनेचा विधी म्हणून जागरण हा कुलाचार पाळला जातो. वाघ्या आणि मुरळी हे खंडोबाचे भक्त असतात. महाराष्ट्र कर्नाटक व आंध्र प्रदेशातील खंडोबा हे कुलदैवत मानले जाते लग्न, मुंज इत्यादी समारंभानंतर जागरण करण्याची प्रथा आहे देवीचा गोंधळ व जागरण एकाच वेळी घालतात. घर भरणे, गादी भरणे, कोटंबा, तळी भरणे इत्यादी विधी ह्या जागरण या लोकविधीमध्ये केले जातात.

**३.बहुरूपी**- निरनिराळी सोंगे आणून लोकांची करमणूक करणे हा या जातीच्या उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. गावोगाव भटकून वेगवेगळे रूपे धारण करून लोकांचे मनोरंजन करणे बहुरूपी ही लोकरंजनाची फार जुनी संस्था आहे. संतांच्या सानिध्यात बहुरुप्याचे दृष्टांत वारंवार आले आहेत परमेश्वर हा एक मोठा बहुरूपीच आहे. तो सतत आपली रूपे प्रकट करीत असतो, असा आध्यात्मिक दृष्टांत संत काव्यमध्ये आढळतो. संत तुकाराम महाराजांनी त्यांच्या अभंगात परमेश्वराचे वर्णन करताना खालील प्रमाणे उल्लेख केलेला आहे.

" बहुरूपी नटला नारायण सोंग संपादन जैसा तैसा "

बहुरूपी यांना आपले कलाकौशल्य दाखविण्यासाठी कोणत्याही प्रकारची रंगभूमी व पार्श्वभूमी लागत नसते. पण जग ही एक रंगभूमी आहे हे शेक्सपियरचे बहुचर्चित विधान बहुरूपी सार्थ करतात. स्थळ, काळ, दिवस, रात्र, रस्ता, घर बाजार ,चावडी असे कोठेही व कोणतेही बंधन न मानता बहुरूपी आपली कला सादर करत असतात

४.चित्रकथी- महाराष्ट्रामध्ये एकेकाळी अत्यंत वैभवशाली अवस्थेत असणारी परंतु आता बऱ्याच अंशी काळाच्या उदरात व शहरीकरणाच्या रेट्यात हरविण्याची भीती निर्माण झालेली लोककला म्हणजेच चित्रकथीची लोककला होय सचित्र कथन कला ही चित्रकथीची लोककला समजली जाते चित्रकथन हा कमालीचा कुशल असा लोकरंजन प्रकार आहे, तोजे कथाकथन करतो ते चित्र गीत आणि नाट्य यांचा त्रिवेणी संगमाचा कलापूर्ण अविष्कारच असतो कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वराच्या मानोसोल्लास या

ग्रंथामध्ये चित्रकथांचा उल्लेख सापडतो. आजचे युग व्याख्यानांचे युग आहे प्राचीन काळात चित्रे दाखवून व त्यासंबंधी कथन करणे व निवेदनाच्या माध्यमातून प्रसंग खुलून सांगणे हे वैशिष्ट्य ह्या लोककलेचे होते. चित्रकथन हा चित्रकथैंच्या उदरनिर्वाहाचा व्यवसाय असल्याकारणाने आपल्या व्यवसायास आवश्यक असणाऱ्या चित्रकलेची पारंपारिक पद्धतीने उपासना करतात. परंपरासातत्यामुळे चित्रकथांची चित्रे काढण्याची पारंपारिक चित्रशैली विकसित आणि रूढ झालेली आहे विरांगणाच्या कथा, पोवाडे हे चित्रकथांचे विषय असतात.

७.वासुदेव- महाराष्ट्राची लोक रंगभूमी गाजवणारे व सकाळीच वातावरणात चैतन्य आणणारे वासुदेवाचे हे पात्र ग्रामीण भागामध्ये महत्त्वाचे मानले जाते. टाळ आणि चिपळ्या घेऊन एखाद्या मंदिरात किंवा कुठेतरी अंगणात वासुदेव येतो. डोक्यावर मोरपिसांची टोपी, घुंगराचे चाळ आणि कंबरेच्या शेल्यात खोसलेली बासरी असा त्यांचा देखावा किंवा देखणा वेष पाहून मनप्रसन्न होते. "दान पावलं दान पावलं पंढरपुरात विठोबा रायाला" समाजावर सुसंस्कार करणे व गीतामधून नीती प्रधान तत्त्वज्ञान सांगणे आपल्या सरळ मार्गावर चालणे, ईश्वराचे भय ठेवणे, पापाची भीती बाळगणे, पुण्य कर्म करणे, परोपकार करणे असा सोपा व साधा उपदेश वासुदेव करतात.

८.आदिवासी लोकनृत्य- धर्मस्वाश्रद्धेतून आदिवासी नृत्यांचा उगम झालेला आहे ग्रामदेवतेच्या पूजनाचा विधी म्हणून नृत्य केले जाते कनसरी मातीला प्रसन्न करण्यासाठी कांबडनाच करतात. महादेव गौरी देवतेच्या पूजेनिमित्त गौरी नृत्य, श्रद्धा विधी म्हणून काजनृत्य करतात. तारपानृत्य हे आदिवासींच्या लोकनृत्याचे नाव आहे. गौरीगणपती, दसरा, दिवाळी, घरभरणी या विशिष्ट प्रसंगी तारपानृत्य करतात. घुंगुरकाठी जमिनीवर आपटून छनछन आवाज करीत ठेका धरून आदिवासी हे नृत्य करतात. गोंड या आदिवासींमध्ये दंडार हे लोकनृत्य खेळतात. आषाढ पौर्णिमेपासून दंडार नृत्य हे सुरू होते.

९.वाघ्या मुरळी-महाराष्ट्र, कर्नाटक, आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यात खंडोबा या क्षेत्रपाल देवतेच्या उपासनेशी निगडित ही लोककला आहे. खंडोबाचे उपासक म्हणून वाघ्या मुरळी असतात. ही लोककला जागरणाच्या माध्यमातून सादर केली जाते याप्रमाणे अनेक लोककला महाराष्ट्रात व इतर राज्यात प्रचलित आहेत.

१०.लोकनाट्य- ही लोककला प्रचलित आहे यामध्ये सोंगाड्याच्या माध्यमातून बतावणीतून वगनाट्यातून कृष्ण आणि मावशीच्या संवादातून सामाजिक स्थितीगतीवर लोकांच्या स्वभाव विशेषावर टीका टिपण्णी केली जाते.

**लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा संबंध**

प्रास्ताविक- लोककथा व लोककला यांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेशी अतिशय जवळचा संबंध आहे. आणि हा संबंध लोकसंस्कृतीच्या आर्थिक मूल्याशी येत असतो तो खालील प्रमाणे,

१.स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना- लोककलेमध्ये हस्तकला पारंपारिक वस्त्रे सजावटीच्या वस्तू स्थानिक बाजारपेठेत विकल्या जातात. त्यामुळे ग्रामीण आणि आदिवासी समुदायाच्या अर्थव्यवस्थेला मदत होते. दिवाळी सणासाठी हस्तकलेच्या वस्तू त्यामुळे विविध नक्षीकाम केलेले मातीच्या पणत्या आकाशदिवे, मकरसंक्रांति, बैलपोळा या सणानिमित्त मातीचे बैल व सुगडी इ. सुवासिनीच्या विविध वाणाच्या वस्तू या ग्रामीण भागातील विविध व्यवसायिकाकडून तयार केल्या जातात. व विक्रीसाठी त्या बाजारपेठेत उपलब्ध केल्या जातात. त्यातून आर्थिक व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

२.बारा बलुतेदार पद्धतीत वस्तूविनिमय- ग्रामीण भागात बारा बलुतेदार पद्धती प्रत्येक जातीतील व्यवसायानुसार वस्तू बनवल्या जातात. मग त्या वस्तू धान्य व इतर वस्तूच्या स्वरूपात एकमेकांना हस्तांतरित होत असतात. उदा. केरसुणी ही वस्तू दिवाळसणसाठी शेतकरी कुटुंबात व इतरांना एका विशिष्ट बलुतेदाराकडून दिली जाते. त्या मोबदल्यात त्या बलुतेदराला धान्य व इतर वस्तूंची देवघेव होते.

३.विविध पाककृती तयार करणे- दिवाळी सणासाठी गौरी गणपती, नवरात्र उत्सव याकरता फराळाचे पदार्थ तयार करणे, संक्रांतीसाठी हलव्याचे दागिने तयार करणे, तिळगुळ या तयार करण्यासाठी ग्रामीण भागातील विशिष्ट लोक या गोष्टीत रस घेतात. याकरता ग्रामीण भागातील व्यावसायिक उत्पादन करून आर्थिक मजबुती त्यांना प्राप्त होत असते

४.श्रावण महिन्यातील व्रतवैकल्ये- ग्रामीण भागातील रानभाज्या ऊस, हरभरा यांची विक्री केली जाते व त्यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते

५.रोजगार निर्मितीसाठी- वारली नक्षीकाम व विणकाम भरतकाम यामुळे हातमाग साड्या विविध हस्तकलेचे नक्षीकाम केलेले वस्त्रे यांची विक्री व खरेदी होते. व परिणामी बाजारपेठेत आर्थिक उलाढाल होते. त्याचप्रमाणे लोककलेची संबंधित उद्योग आणि उपक्रम जसे की पारंपारिक संगीत नृत्य आणि कलाकृतींची निर्मिती लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात.

६.सांस्कृतिक जतन आणि आर्थिक मूल्य- लोककथा आणि लोककला या केवळ सांस्कृतिक वारसा नाहीत. तर त्यातून आर्थिक मूल्य देखील मिळते कला आणि कथांच्या माध्यमातून पारंपारिक ज्ञान कौशल्य आणि कलात्मक अभिव्यक्ती जतन केल्या जात असतात. त्याचप्रमाणे त्या समाजाच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे या दोन्हींच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना मिळते.

७.कारागिरांना पाठिंबा- हस्तकला आणि पारंपारिक कलांची विक्री ग्रामीण कारागिरांसाठी उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्त्रोत ठरते. जेणेकरून त्यांचे जीवनमान टिकून राहते. हातमाग,चरखा मातीची भांडी लाकडी वस्तू, लोकनृत्य, लोकगीत तसेच गोंड, वारली, मधुबनी सारख्या चित्रकला इ.चा समावेश असल्याने ही उत्पादने आणि कला सादरीकरण करणे कलाकारांना थेट रोजगार आणि उत्पन्न देतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होते

८.स्थानिक संसाधनांचा उपयोग- ग्रामीण कला ही प्रामुख्याने स्थानिक कच्च्या मालावर आधारित असते उदा. माती, कापूस, बांबू,लाकूड, नैसर्गिक रंग यामुळे स्थानिक उत्पादनचक्र टिकून राहते आणि बाहेरील संसाधनावर अवलंबित्व कमी राहते.

९.पर्यटन वाढ व अर्थ प्रवाह- लोककलेमुळे ग्रामीण पर्यटनाला चालना मिळते लोककथा व लोककलेची संबंधित पारंपारिक सण आणि विधी हे पर्यटकांना आकर्षित करतात. लोकनृत्य महोत्सव हस्तकला प्रदर्शन, ग्रामीण भागातील आठवडे बाजार, बचत गटातील महिलांनी तयार केलेले पदार्थ उदा. लोणची, पापड, कुरडया विविध खाद्यपदार्थ याकडे पर्यटक आकर्षित होतात. परिणामी गावात पर्यटक खर्च करतात. त्यामुळे दुकानदार, हॉटेल्स, वाहतूक, मार्गदर्शक यांना अतिरिक्त रोजगार मिळतो.

१०.महिलांचे सक्षमीकरण- लोककलांमध्ये महिलांचा वाटा मोठा असतो. भरतकाम करणे, चोळी घागरा तयार करणे, विविध फॅन्सी ड्रेस व ब्लाऊज शिवणे, हस्तकलेचे दागिने तयार करणे इ. महिलांना घरी बसून उत्पन्न मिळते आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारते.

११.जतन व बाजारपेठ- ग्रामीण कला जपली गेल्यास गावातील पारंपारिक कौशल्य टिकते. नवीन बाजारपेठ मिळाल्यास ऑनलाईन विक्री, सरकारी प्रदर्शन व सहकारी संस्था त्यांच्या उत्पन्नात परिणामी वाढ होते.

१२.ग्रामोद्योग व सहकारी संस्था- वारली कला, खेळणी, चिखलशिल्प, बिद्रीकाम, कोल्हापुरी चप्पल, पैठणी या सर्व लोककला व ग्रामोद्योगातून मोठ्या प्रमाणात ग्रामीण अर्थव्यवस्थेला मदत मिळते.

१३.मूल्य संवर्धन- लोककलेच्या सहाय्याने त्याला आधुनिक डिझाईनची जोड दिली तर नवीन उत्पादने बनविता येतात त्यामध्ये गृहसजावटीच्या वस्तू, गिफ्ट देण्यासाठी वस्तू यातून उत्पादनाचे मूल्य वाढते. व त्या सृजनशीलतेतून कलाकारांना प्रोत्साहन मिळते व अधिकाधिक ग्राहकांच्या मागणीमुळे जास्तीत जास्त नफा मिळतो.

१४. शेती आणि संलग्न उद्योग - ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. त्यामध्ये पीक उत्पादन फळबागा, बागवानी पशुपालन आणि मत्स्यपालन यासारख्या कृषीआधारित उद्योगांचा समावेश होतो.

१५.पारंपारिक व्यवसायाची पुनर्स्थापना- तरुणांना पारंपारिक हस्तकला आणि सादरीकरण स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाते त्यामुळे त्यांच्या मागणीत वाढ होते त्यांचे वैभव पुनर्संचयित होण्यास मदत होते.

१६.विविधीकरण- ग्रामीण अर्थव्यवस्था केवळ शेतीवरच अवलंबून न राहता लघु आणि मध्यम उद्योगांना चालना देते. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

समारोप- लोककथा व लोककला ह्या लोकसाहित्याचे महत्वाचे लोकसंस्कृतीचे घटक आहेत. म्हणजेच स्थानिक समाजाच्या सामाजिक नैतिक मूल्यसंस्कार, अभिरुचीसौंदर्य व आर्थिक मूल्यांच्या आरसा म्हणून लोककथाना व लोककलांना महत्त्व दिले गेले आहे. लोककला ह्या लोकपरंपरेत वारसा म्हणून विधिकार्माच्या माध्यमातून सादर केल्या जातात. निखळ मनोरंजन व समाज दर्शन हे या कलांचे निव्वळ प्रयोजन नसते, तर प्राकृतिक मुक्तता, उत्स्फूर्तपणा व लवचिकता त्यात असते. पुराण धर्मग्रंथ,संतसाहित्य यातील धर्म तत्त्वज्ञानाचा आशय आणि लोकभाषेत आणि लोकप्रतिमातून सादर करण्याचे कौशल्य हे लोककलाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. त्यामुळे धर्माचे सामाजिकीकरण करणे व गाव समाजाची एकजन्सी बांधणी करणे हे महत्त्वाचे कार्य या लोकसाहित्याचे आहे. म्हणूनच नेपथ्य संघाची सजावट, पोशाख रंगलेपण करणे ही विविध कौशल्य ही लोककलाकारांनी या लोकसंस्कृतीतून विकसित केलेली आहेत. व ती परंपरेने सांभाळलेली सुद्धा आहेत म्हणून ग्रामीण लोककला ही फक्त कलाच नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे लोककथा, लोककला या लोकांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा आरसा आहेत तर अर्थव्यवस्था ही त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. त्या केवळ सांस्कृतिक वारसाच नाहीत तर लोककलेतून निर्माण होणाऱ्या वस्तू आणि सेवांना मागणी असल्याने अर्थव्यवस्थेला चालना मिळते व रोजगाराची निर्मिती होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेची भरभराट होते. महाराष्ट्र हे सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असे राज्य आहे. ग्रामीण भागातून आजही विविध समाज गट ही संपन्नता जोपासत आहे. कीर्तन, दशावतार, भारुड, लळीत, वगनाट्य, तमाशा, लोकनाट्य, कलगीतुरा, कुडमुडे जोशी व गावातील वेगवेगळे जत्रा आणि उत्सव यातून रंगभूमीची बीजे दिसतात. आणि म्हणूनच या लोककला विकसित करायच्या असतील तर त्यांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेची सहसंबंध जुळण्यासाठी काही आव्हाने पेलावेच लागतील. त्यामध्ये बाजारपेठेची उपलब्धता, तंत्रज्ञानाचा अभाव असेल तर त्याचप्रमाणे शिक्षणाचा अभाव, नैसर्गिक आपत्तीचा धोका यासारख्या समस्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरी येतात त्या दूर करूनच आपण आपली ग्रामीण अर्थव्यवस्था सांभाळली पाहिजे. म्हणूनच

शासकीय योजना आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण कला यामध्ये सुधारणा करता येते.

निष्कर्ष-लोककथा व लोककला व ग्रामीण अर्थव्यवस्था प्रस्तुत शोधनिबंधातून खालीलप्रमाणे

निष्कर्ष स्पष्ट होतात.

निष्कर्ष:

१.लोककथा व लोककला या फक्त सांस्कृतिक अभिव्यक्ती नसून ते एक ग्रामीण भागातील जीवनाचे मुल्ये, परंपरा व सामाजिक परिसराचे ज्ञान आहे.

२. लोककथा व लोककला या लोकसंस्कृतीच्य मुख्य वाहक आहेत.

३. लोककथा व लोककलाच्या विविध प्रकारांशी ग्रामीण व शहरी भागातील लोकांचा घनिष्ठ संबंध असून लोक रीतीरिवाज व प्रथा परंपरा पाळतात.

४.ग्रामीण भागातील शिल्पकला ,नृत्य, संगीत,चित्रकला हसव्याव्साय लोकनाट्ययामधून स्थानिक कलाकारांना रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

५. लोककथा व लोककलामुळेग्रामीण भागतील महिलांचे सक्षमीकरण व सबलीकरण होते.

६.ग्रामीण विकास, सांकृतिक स्वरक्षण आणि आर्थिक प्रगती यांना जोडणारा महत्वाचा दुवा

म्हणजेच लोककथा व लोककला होय.

संदर्भसूची-

१.मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याची स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, स. आ.जानेवारी २०१७

२ चिने (डॉ)गीतांजली,'लोकसाहित्य व ग्रामीण साहित्य यांचा परस्परअनुबंध'आनंदोत्सव प्रकाशन मंच,

अहमदनगर प्र आ एप्रिल २०१५ .

३ भवाळकर तारा,' लोकसाहित्याच्या अभ्यास दिशा,' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे .प्र आ जुलै २००९ ४ शिंदे

(डॉ) विश्वनाथ, लोकसाहित्य मीमांसा भाग पहिला' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे जानेवारी 1998

५ लोक वाड्मयमय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

६ देखणे (डॉ) रामचंद्र, 'महाराष्ट्राची सांस्कृतिक लोकक गंधा प्रकाशन, पुणे.

**Copyright & License:**

© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.